# मुलाखत

# प्रा. डॉ. मोहन पाटील यांची अभ्यासकाने घेतलेली मुलाखत

नमस्ते सर,

प्रश्न १ : सर आपण लेखनाला कधी सुरुवात केली. ?

उत्तर : माध्यमिक शाळेत शिकत असताना वर्गवार फिरत्या ग्रंथालयातून हातात पडणारी पुस्तके, पुढे महाविद्यालयातल्या ग्रंथालयातील ललित साहित्य आणि हाताशी मिळणारी पुस्तके मी सपाटून वाचत असे. आधी वाचन मग लेखन असा क्रम माझ्या बाबतीत घडला हे आता; त्या काळात डोकावून पाहताना माझ्या ध्यानात येते. वाचता वाचता, वाचलेले अनुभवातले किती ? आणि प्रत्यक्ष वास्तव कसे हे ? हयाचे चिंतन करता करताच लिहिण्याची उर्मी आली. मी लिहू शकतो. मला लिहिता येते. वास्तव, माणसे शब्दातून व्यक्त करता येतात हे मला समजले. मग मी लिहू लागलो. तो काळ साधारण १९८० च्या आसपासचा म्हणता येईल.

प्रश्न २ : मराठीमध्ये अनेक साहित्यप्रकार आहेत. त्यातील कोणता साहित्य प्रकार तुम्हाला अधिक आवडतो ?

उत्तर : मराठीत अनेक साहित्य प्रकार आहेत. ठरवून साहित्य प्रकाराची निवड करता येते असे म्हणता येत नाही. मी कविता लिहिल्या. कथा लिहिली. कादंबरी लिहिली. समीक्षा म्हणता येणार नाही पण त्याला निरीक्षण म्हणता येईल चिंतन म्हणता येईल असेही थोडेफार लिहिले. मी एकांकिकाही लिहिल्या. परंतु प्रामुख्याने कथात्मक साहित्य हाच माझा पिंडधर्म आहे व तो अधिक लिहिला.

प्रश्न ३ : तुम्ही ग्रामीण कादंबरीकार म्हणून परिचित आहात या तुमच्या कांदबरी लेखनामागच्या प्रेरणा सांगा.

उत्तर : माझ्याबरोबर वयाने वाढत, बदलत जाणारा भोवताल गाव त्यातून निर्माण होणारे झोंबरे प्रश्न आणि अस्वस्थ करणारी परिस्थिती हा माझ्या लेखनामागचा रेटा असावा.

प्रश्न ४ : तुमच्या साहित्य लेखनावर कोणत्या लेखकाचा प्रभाव जाणवतो ?

उत्तर : प्रभाव वाचनाचा आणि अनुभवाचा. अनुभव हाच गुरु.

प्रश्न ५ : आजच्या नियतकालिकानी तुमच्या लेखनाला योग्य तो न्याय दिला आहे का ?

उत्तर : लेखकाच्या लेखनाबद्दल बरे वाईट म्हटले जाते. कधी काहीच म्हटले जात नाही. ते स्वाभाविकच. त्यात अधिक गुंतून पडू नये असे मला वाटते.

प्रश्न ६ : जागतिकीकरणाच्या रेटयात ग्रामीण माणसांची होरपळ होत आहे का? याविषयी तुमचे मत सांगा.

उत्तर : जागतिकीकरणाच्या रेटयात गावात राहणाऱ्या, शेतीशी संबंधित असणाऱ्या, कास्तकार, मजूर, स्त्रिया, मुली, तरुण या सर्वांची होरपळ होते आहे असे म्हणण्यापेक्षा त्यांची अस्तव्यस्त धावपळ, धडपड, दगदग होते आहे असे म्हणणे अधिक रास्त आहे. ग्रामीण माणूस त्यात ओढला जातोय आणि त्याला या लोंढयापासून स्वतःला वाचवून काठावर येता येणार नाही याचीही अपरिहार्य जाणीव झालेली आहे. शिक्षणाचा अभाव, जातीधर्माचा पगडा, आर्थिक कोंडी, पैशाची स्पर्धा आणि अपुरी शक्ती यात त्याची ससेहोलपट होते आहे. त्यांची निर्णयक्षमता केविलवाणी झाली आहे.त्यामुळे ग्रामीण माणसातला 'नाही' म्हणण्यातला जोर ओसरला आहे. त्याच्या नातेसंबंधात प्रदूषण झाले आहे.

प्रश्न ७ : ग्रामीण साहित्याने मराठी साहित्य विश्वात आपले स्थान भक्कम केले आहे असे तुम्हाला वाटते का ?

उत्तर : साहित्याचे दलित, ग्रामीण असे कप्पे सोयीसाठी आहेत. परंतु नागर आणि ग्रामीण हे जे दोन सांस्कृतिक भेद आहेत ते लक्षणीय आहेत. 'संस्कृती' हे मूल्य आहे असे मानले तर कृषिसांस्कृतिक दर्शन घडवणारे साहित्य केव्हाही जिवंतपणा दाखवते. या दृष्टीने पाहिले तर मराठी साहित्यात जी थोडीफार जिवंत सळसळ दिसते ती कृषिसांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणाऱ्या साहित्यामुळेच असे ठामपणे म्हणावे लागेल.

प्रश्न ८ : जागतिकीकरणाचा चांगला वाईट परिणाम ग्रामीण जीवनावर होताना दिसत आहे याचे पडसाद ग्रामीण साहीत्यातून उमटताना दिसतात का ? याबद्दल तुम्हाला काय वाटते. ?

उत्तर : जागतिकीकरणाचे पडसाद ग्रामीण म्हणवणाऱ्या साहित्यात दिसू लागले आहेत. ग्रामीण भागातल्या लेखणीने मुळातच शहरी मध्यमवर्गीय, व्यापारी आणि फसव्या जाणीवांविरुध्द द्वंद्व पुकारलेले असते. तो तिचा स्वभावच असतो.

प्रश्न ९ : तुमच्या ''गाव आणि मातेच्या कविता'' या काव्यसंग्रहाबद्दल तुम्ही थोडसं बोला.

उत्तर : ''गाव आणि मातेच्या कविता'' हा माझा १९८१ साली प्रसिध्द झालेला कवितासंग्रह या कवितेत माझी गावाविषयीची संवेदना व्यक्त झाली आहे. तशी 'माता' म्हणजे जन्मदात्री व जन्मदेणारी माती तिला माझ्या विषयी कोणत्या भावना, संवेदना, इच्छा, आकांक्षा आहेत. त्याविषयीची करुणा आहे. 'मातेच्या कविता' माझ्यासारख्या असंख्य मुलांविषयीच्या करुणा भाकताना दिसतील.

प्रश्न १०: ग्रामीण साहित्य चळवळीने सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तने घडवून आणली आहेत का ? या विषयी तुमचं मत काय ?

उत्तर : ग्रामीण साहित्याने अथवा मराठी साहित्याने सामाजिक सांस्कृतिक दर्शन घडवले आहे असे म्हणता येईल.

प्रश्न ११: ग्रामीण लेखकांना एक स्वतंत्र व्यासपीठ मिळावे याबद्दल काय वाटते?

उत्तर : स्वतंत्र व्यासपीठ प्रत्येकालाच आहे. अभिव्यक्त व्हायला कुठलेही व्यासपीठ नकार देत नाही.

प्रश्न १२ : 'साखरफेरा' ही कादंबरी का लिहावीशी वाटली.

उत्तर : पश्चिम महाराष्ट्रातली ऊस—उत्पादक शेतकऱ्यांची चळवळ आणि ऊस —उत्पादकांची गांधी मार्क्स प्रणीत मानसिकता, तिचे प्रत्यक्ष वास्तव काय ? हे दाखवावे असे माझ्या मनात आले म्हणून 'साखरफेरा ' लिहिली.

प्रश्न १३ : 'साखरफेरा' हया कादंबरीचे शीर्षक कसे सुचले ?

उत्तर : 'मरीआईचा फेरा' यावरुन, 'साखरफेरा' सुचले.

प्रश्न १४ : लेखना व्यतिरिक्त तुमचे इतर छंद कोणते ?

उत्तर : वाचन, शेतात रमणे आणि गप्पा मारणे हे छंद आहेत.

प्रश्न १५ : सर, आपले भविष्यातील लेखनविषयक संकल्प काय आहेत ?

उत्तर : मी वर्तमानात अधिक घुटमळतो. संकल्प तसे अनेक असतात. आहेतही. बघू ते कसे कसे पूर्ण होतात ते.